# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०६/०४/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील लक्ष्मीनगर काटोल येथे दिनांक ०२/०४/२०२२ चे १२:०० वा. ते दिनांक ०५/०४/२०२२ चे ११:३० वा. पर्यंत फिर्यादी नामे— विजय त्रयंबकराव कडु, वय ६४ वर्ष, रा. लक्ष्मीनगर काटोल ता. काटोल हे पुतनी बिमार असल्याने वर्धा येथे गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपाटातील असलेले नगदी ५०,०००/— रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार दलाल मो.नं. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील कान्हादेवी शिवार येथे दिनांक ०३/०४/२०२२ चे १९:०० वा. ते दिनांक ०४/०४/२०२२ चे ११:०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रजविंदरसिंग बलविरसिंग ढिल्लो वय ३४ वर्ष रा. नारी रोड नागपुर ह.मु कान्हादेवी मौजा कान्हादेवी यांची मौजा कान्हादेवी शिवारात ५५ एकड शेती असून त्या शेतात संत्रा, मोसंबी, आंबा व चिकु ची झाडे लावलेली असून ३०० चिकुच्या झाडाला चिकु लागलेली आहेत. फिर्यादीचे शेतात मजुरांनी तोडून ठेवलेले अंदाजे ५०० किलो चिकु किंमती २५,०००/— रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रोशन काळे मो.क्र. ८८३०५०९४४१ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर